THE MUSEUM CSMVS MUMBAI

सी.एस्.एम्.वी.एस्. बाल वस्तुसंग्रहालय
बँक ऑफ अमेरिका यांच्या उदार सहयोगाने कार्यरत आहे

# हडप्पा संस्कृती

## तथ्ये

मानवाने तयार केलेल्या वस्तू म्हणजेच मानवनिर्मित ***कलाकृती***.

*इतिहासकार* आणि *पुरातत्वशास्त्रज्ञ* कलाकृतींचा अभ्यास करून आपल्याला भूतकाळातील आयुष्याविषयी सांगतात. ह्या कलाकृतींचे सूक्ष्मनिरीक्षण करून आपल्याला गतकाळातील लोक, त्यांचे व्यवसाय, करमणूक पद्धती, विचारशैली, वसाहत, कला आणि बऱ्याच गोष्टींबद्दल कळून येते.

आज तुम्ही इतिहासकार होणार आहात हडप्पन संस्कृतीतील कलाकृतींचे परीक्षण करणार आहात.

## धर्मगुरू

**धर्मगुरूच्या चित्राला रंगवा.**




मोहेंजोदडो च्या उत्तखननात एक दगडी अर्धपुतळा सापडला होता. हा पुतळा एका पुरुषाचा असून त्याने एक भरतकाम केलेली शाल खांद्यावर ओढलेली आहे. ह्या अर्धपुतळ्यास 'धर्मगुरू' म्हणून ओळखले जाते. हा पुतळा ई. स. पूर्व २०००-१९०० दरम्यान बनवला गेला होता. पुतळ्याची दाढी आणि डोक्याला बांधेलेला पट्टा नीट निरखून पहा.




## हडप्पा संस्कृतीतील मोहरा आणि मुद्रिका

मोहरा आणि मुद्रिका म्हणजे काय?

तुम्ही पोस्ट ऑफिसमधून पार्सल आलेले पाहिले आहे का? तुम्ही काळजीपूर्वक निरीक्षण केल्यास, त्या पार्सलला एक लाल रंगाचा लहान द्रवाचा गोळा टाव्यासारखा चिटकवलेला असतो. अजून निरखून पाहल्यास त्या लाल गोळ्यावर काही शब्द उमटवलेले दिसतात. ह्यालाच पार्सल सुरक्षित किंवा शिक्कामोर्तब करणे म्हणतात.
एका धातू ने बनवलेल्या ह्या उपकरणास **'मोहर'** असे ओळखले जाते आणि ह्याचा वापर पार्सल सीलबंद आणि प्रमाणित करण्यासाठी होत असे. अशाचप्रकारे हडप्पातील लोकं कधी दगडापासून तर कधी धातूपासून निर्माण केलेल्या मोहोरांचा वापर माल सीलबंद करण्यासाठी करत असत. माल सीलबंद करण्यासाठी ओल्या मातीवर ठसे पाडून मुद्रिका तयार केल्या जात असत. लोथल येथील उत्खननात मातीवर मोहरांचे ठसे (मुद्रा व मुद्रिका) सापडले आहेत.




तुमची स्वतः ची हडप्पा संस्कृतीतील मोहर बनवा.




## हडप्पा संस्कृतीची खेळणी

हडप्पा संस्कृतीतील लोकांना मातीतुन खेळणी बनवायची कला खूप चांगल्यारीत्या अवगत होती.







हडप्पा संस्कृतीतील खेळण्यांना रंगवा

प्रश्न - तुम्हाला खेळणी बनवायची असल्यास तुम्ही कुठले साहित्य वापराल?


उत्तर - ------------------------------------------------------------

## हडप्पा संस्कृतीतील भांडी

हडप्पा संस्कृतीचे लोक मातीपासून भांडी, वाटी, थाळी, पेले आणि फुलदाण्या बनवून मग भाजत असत. बहुतेक भांडी साधी होती, परंतु काही फुलांच्या आणि प्राण्यांच्या नक्षीने सजवल्या जात असत.
खाप्रांवरील सुंदर नक्षीकामावर लक्ष द्या.



दिलेल्या मातीच्या खाप्रांच्या सहाय्याने हडप्पा संस्कृतीतील तुमचे स्वतः चे भांडे तयार



# हडप्पा संस्कृती - शब्द कोडे



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सां | ई | म | का | ते | सिं | धू | स्म | फे | लें | ग्र | वं |
| पौ | ड | ट | च | झं | आ | में | टी | घा | भे | यी | नै |
| जी | सो | पा | ख | आ | ले | था | चे | छो | खे | ळ | णी |
| ॲ | वृ | णो | णी | ऋ | मा | शी | ॲ | ऊ | क्र | न | डो |
| ले | बि | थु | श्री | क्ष | न | न | बॅ | यी | सा | श्री | नू |
| नी | घो | भ | घॉ | क | ग्र | यु | सें | न | ता | क्री | छी |
| चा | म | णी | त्रा | ऑ | द | जा | डो | वृ | र्जी | हो | ने |
| यु | ञा | फा | का | बा | हं | त्ख | नू | टा | यू | णि | हा |
| ह | र्ल्स | था | ङ | डू | डे | घा | बा | ॠ | वे | भ | ॲ |
| प्प | थू | सु | ठै | छ् | वं | जा | धू | त्र | री | घे | न |
| बा | ऍ | पौ | शौ | लो | ळ | ठै | पा | ष | थु | ल्ला | दी |
| थो | ले | फे | धू | जा | स्प | र | ऊ | ण | खे | ग्री | फू |
| ल्यु | श्री | कि | क्क | छे | दी | ग्र | प | मो | फ्रे | में | पा |
| म्र | औ | ल्यु | ल्ला | इ | थु | ता | बा | ष | ट | त्ख | वृ |
| खि | झि | भा | ग्र | प | ना | ऊ | भ | गे | घे | शै | न |
| मो | फि | ऑ | ता | बा | ई | मा | ॲ | खी | न | डो | ञा |
| हें | ॠ | वे | भां | डी | क | ग्र | सा | क्ल | कि | सिं | ठा |
| जो | त्र | री | गी | री | ॲ | म | सां | प्ल | शी | ञा | जो |
| द | ए | क्ष | जा | मि | र्जी | र्ल्स | था | हा | चा | ठा | खे |
| डो | मे | त्रि | झं | ळू | वे | द | ऑ | पी | नू | र्ल्स | घा |
| ऊ | ळी | ट | बॅ | उ | त्ख | न | न | जो | छो | वं | दी |
| न | डू | नी | क्यू | ष | वं | था | शी | दी | हं | ले | क्क |
| त्यू | अ | भौ | ह | ड | प्पा | ळ | णी | बा | वे | सा | ठा |

---

बालेकिल्ला
सिंधू
मणी
ॲगेट
बॅनर्जी
हडप्पा
भांडी
हंडे

सांडपाणी
नदी
जास्पर
चार्ल्स
उत्खनन
मोहेंजोदडो
साठा
खेळणी

